# नियमित दिवाणी मु.नं.४६/२०१६ मधील नि.११५ खालील आदेश

(शिवाजी बाळु बिरवाले विरुध्द अल्पेश आनंदराव चव्हाण व इतर ०२)

---

वादीतर्फे विद्वान वकील श्री. ए. एच. ढेरे./जानुगडे.

प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री. आर. सी. शहा.

---

वादी यांनी या कामी निशाणी ७१ येथे वादीतर्फे दाखल सही शिक्याच्या कागदपत्रांना निशाणी देणेत यावी अशी विनंती वादींनी केली होती. त्यावर माझे सन्माननीय पुर्वाधिकाऱ्यांनी वादीस संबंधित कागदपत्रावरील साक्षीदार तपासणे आवश्यक असलेचे अनुमानित करुन तसा साक्षीदार तपासणेस परवानगी दिली होती. त्यानुसार संबंधित साक्षीदार यांना न्यायानयाने साक्षी समन्स काढले होते. सदरील साक्षीदार हे या कामी हजर झालेवर, त्यांनी केवळ वादीचे नावे कारखान्यास विक्री केलेल्या ऊसाची बीले आणली आहेत परंतु वादी यांचा ऊस यापुर्वी 'सह्याद्री सहकारी साखर कारखाना, यशवंतनगर' येथे वादीचे बरोबर किसन बाळु, मधुकर बाळु आणी लक्ष्मण बाळु बिरवाले यांचे नावे देखील विकला असल्याने साक्षीदाराने त्या बाबतची देखील कागदपत्रे या कामी दाखल करावी या करिता साक्षीदारास तसे आदेश देणेत यावेत या करिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**(०२)** प्रस्तुत अर्जास प्रतिवादींनी अर्जावरच त्यांचे म्हणने दाखल करुन तीव्र हरकत घेतली आहे. प्रतिवादींचे कथन असे आहे की, वादींनी प्रस्तुत अर्जात केलेली कथने दाव्यात नमुद नाहीत. सबब दाव्यात तसे प्लीडींग नसलेमुहे वादीचा अर्ज मंजुर करता येणार नाही.

**(०३)** वादींचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणने तसेच उभय बाजुनी दाखल कागदपत्रे याचे अवलोकन केले. वादीचा दावा वाचला असता त्यात दावा मिळकत ही वादी सोबत प्रस्तुत अर्जात नमुद इसमांचे सह ताब्यात आहे असे वादीचे कोठेही कथन नाही. कबुल

तथ्यानुसार ज्या इसमांच्या नावे ऊस कारखान्यास गेला आहे असे वादीचे कथन आहे ते इसम या दाव्यात पक्षकार नाहीत ही वस्तुस्थिती आहे. दावा मिळकत ही वादीचे प्रत्यक्ष ताब्यात आहे हे वादीने सकृतदर्शनी सिध्द केलेले नाही हे या दाव्यातील निशाणी ०५ चा अर्ज निर्णीत करतेवेळी तत्कालीन सन्माननीय पुर्वाधिकाऱ्यांनी दिलेले निश्कर्ष अपीलाचे कामी देखील कायम राहीलेले आहेत. अशा परिस्थितीत केवळ वादी मागतो म्हणुन ज्या इसमांचा या दाव्याशी संबंध नाही, की जे कबुल तथ्यानुसार या दाव्यास पक्षकार नाहीत, त्यांच्या बाबतची कागदपत्रे, ते ही त्यांचे संमती शिवाय या कामी हजर करुन घेणे न्यायोचित होणार नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. सबब वादीचा हा अर्ज व त्यातील मागणी संयुक्तीक नसलेमुळे तसेच ती दाव्यात नमुद नसलेमुळे फेटाळणे आवश्यक आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | नि.११५ वरील अर्ज नामंजूर करणेत येतो. |
| २. | अर्जाचा खर्च दाव्याचे खर्चात सामाविष्ट करणेत येईल. |

KIRAN RAJARAM KHONDRE

Digitally signed by KIRAN RAJARAM KHONDRE
Date: 2026.02.05 11:45:47 +0530

कऱ्हाड. (किरण खोंद्रे)

दि.०४/०२/२०२६. ३रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,कऱ्हाड.